# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१** **दि. १९ जुलै, २०२१**

**(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)**

---------------------------------------------------------

जळगाव दि.१९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात काम करणाऱ्या दैनिक वेतनिक महिलांसाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि योग मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आरोग्य ताणतणाव कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

प्रभारी कुलगुरु प्रा. ई. वायुनंदन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यशाळेचे उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.बी.व्ही.पवार होते. यावेळी मंचावर प्रभारी कुलसचिव डॉ.एस.आर.भादलीकर, स्त्री अभ्यास केंद्राच्या प्रमुख प्रा.रत्नमाला बेंद्रे उपस्थित होते. यावेळी बोलतांना प्रा.बी.व्ही.पवार यांनी कोरोनाच्या या काळात येणाऱ्या मानसिक ताण तणावांना कसे सामोरे जावे यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. डॉ.एस.आर.भादलीकर यांनी मुलांच्या जडण-घडणीत आईचा सहभाग मोठा असल्याने मातांचे आरोग्य उत्तम राहणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. योग मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक विद्यापीठ उपअभियंता आर.आय.पाटील यांनी केंद्राची माहिती दिली. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा.मनीष जोशी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. या कार्यशाळेत महिलांचे आरोग्य, ताणतणाव व योगोपचार याविषयी डॉ.लिना चौधरी, विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी अर्चना सांगळे यांनी मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांच्या विविध शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले. या कार्यशाळेत ७० पेक्षा अधिक दैनिक वेतनिक महिलांनी सहभाग घेतला.

---------------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी